E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१२२३/ प्र.क्र. ६३/ फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२.०५.२०२३

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
उपवनसंरक्षक (प्रा.), नांदेड
उपवनसंरक्षक (प्रा.), डहाणू

विषय:-१) तारापूर-बोरिवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी १०.३३९१ हे. वनजमीन वळती करणेबाबत.
२) १३२ K.V. D/C बोईसर डहाणू (MIDC) ट्रान्समिशन लाईनच्या LILO (Line In Line Out) कामासाठी पालघर येथील २०.५९८३ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

विषयांकित वनजमीन वळतीकरण प्रस्तावांतील खालील मुद्यांच्या अनुषंगाने प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठका घेण्यात आल्या होत्या. सदर बैठकांमध्ये खालील मुद्यांची तपशीलवार माहिती तात्काळ सादर करण्याबाबत प्रधान सचिव यांनी निर्देश दिले होते. सदरची माहिती अद्याप अप्राप्त आहे. आपल्याकडील माहिती अभावी प्रकरणी निर्णय घेण्यास विलंब होत आहे. ही बाब विचारात घेता, खालील मुद्यांची माहिती तात्काळ शासनास सादर करावी.

| | |
|---|---|
| तारापूर-बोरिवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी १०.३३९१ हे. वनजमीन वळती करणेबाबत. | ➢ काही ७/१२ उता-यांवर खाजगी व्यक्तींची नावे असून कूळ कायद्याने प्राप्त जमीन, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम ३६ व ३६ अ अंतर्गत हस्तांतरणास बंदी, नवीन अविभाज्य शर्तीवर, आदिवासी खातेदार असे शेरे आहेत.<br>➢ पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमिनीच्या गा. न. नं. ७/१२ मध्ये पूर्णपणे खाजगी व्यक्तींची नावे नोंदविलेली आहेत. सदर जमिनीत कापूस, सोयाबीन, तूर या पिकांची लागवड करण्यात येत असल्याचेही दिसून येते. उपवनसंरक्षक, नांदेड यांनी मात्र सदर जमीन |

| | |
|---|---|
| | ➢ सदर जमीन राखीव वनजमीन असताना [illegible] अभिलेखात खाजगी व्यक्तींची नावे कशाच्या आधारे आली आहेत, सदर खाजगी व्यक्ती अतिक्रमणधारक आहेत का? त्यांना १९८० पूर्वी जिल्हाधिका-यांकडून जमीन वाटप झाली आहे का? असल्यास, आता ती जमीन पर्यायी वनीकरणासाठी वन विभागाकडे हस्तांतरित करण्यास ते तयार आहेत का? |
| १३२ K.V. D/C बोईसर डहाणू (MIDC) ट्रान्समिशन लाईनच्या LILO (Line In Line Out) कामासाठी पालघर येथील २०.५९८३ हे. वनजमीन वळती करणेबाबत. | ➢ प्रस्तावित केलेले क्षेत्रापैकी मौजे पाम, सर्व्हे नं. २०० व २०१ येथील ७/१२ उताऱ्यावर खाजगी व्यक्तींची नावे दिसून येत असल्यामुळे, सदर जमिन खाजगी मालकीचे कांदळवन असावे असे वाटते. तथापि, त्याबाबतची खात्री होणे आवश्यक आहे.<br>➢ मौजे आगवन, गट नं. एस-१ या क्षेत्राचा ७/१२ अप्राप्त आहेत. सदर क्षेत्राचा ७/१२ उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.<br>➢ KML फाईलवरुन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे घोगरवाडी, रेंज किनवट येथील स.नं./गट नं.८, कंपा क्रं. १९१ बी मधील जमीनीत कठीण दगड असावा. तेथे रोपांची वाढ होऊ शकेल का ? त्यामुळे, सदर जमिन पर्यायी वनीकरणासाठी सुयोग्य आहे किंवा कसे, याबाबत खातरजमा करणे आवश्यक आहे.<br>➢ पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे मंगरूळ, जि. नांदेड स.नं/गट नं. ६, कंपा क्रं. ३२२ येथील क्षेत्रावर यापूर्वीच वनीकरण झालेले असल्याचे अथवा सदर जमिन वहिवाटीखाली असल्याचे दिसून येते. उपवनसंरक्षक, नांदेड यांनी मात्र सदर जमीन राखीव वन असल्याचे नमूद करून पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केली आहे सदर जमिन पर्यायी वनीकरणासाठी योग्य / अतिक्रमण मुक्त आहे किंवा कसे ? याची खातरजम |

| | |
|---|---|
| | ➢ त्याचप्रमाणे पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे मंगरूळ, जि. नांदेड स.नं/गट नं. ६, येथील जमिनीच्या ७/१२ वर खाजगी व्यक्तीची नावे दिसून येतात. प्रस्तावात मात्र सदरची जमिन वनजमिन म्हणून पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केली आहे.<br>➢ सदर जमिन वनजमीन असताना जमिनीच्या अधिकार अभिलेखात खाजगी व्यक्तीची नावे कशाच्या आधारे आली आहेत, सदर वनजमिनीवर अतिक्रमण झाले आहे का? ती जमीन त्यांना जिल्हाधिका-यांकडून वाटप झाली आहे का? असल्यास, आता ती जमीन पर्यायी वनीकरणासाठी वन विभागाकडे हस्तांतरित करण्यास ते तयार आहेत का? |

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

त माहितीस्तव :

कार्यकारी अभियंता, महापारेषण, कल्याण